The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्यातील पर्यावरण

**डॉ. अर्चना काटकर**
मराठी विभागप्रमुख कला महाविद्यालय बिडकीन

अलीकडे मानवी आरोग्य मोठ्या प्रमाणात खलावतांना दिसते. आरोग्य विषयक समस्या वाढल्याने मानवाचे आयुर्मानही कमी झाले आहे. कधीही न ऐकलेले विषाणू, व्याधींचा मानवी शरीरावर परिणाम होतांना दिसतो. त्यावर जागतिक स्तरावर चर्चा होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगवर संयुक्त राष्ट्रसंघाची पॅरिस येथे परिषदही भरली होती. त्यामुध्ये अनेक आंतरराष्ट्रीय करारही करण्यात आले. वातावरणात होणाऱ्या बदलामुळे जनजीवनावर, आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा विचार करून उपाय शेधण्यातयेत आहे. पर्यावरणीय बदलामुळे अनेक समस्यांना आपण सामोरे जात आहोत.

'वसुंधरा वाचवा', 'पाणी अडवा', पाणी जिरवा', 'वन्य प्राण्यांचे संरक्षण करा', 'पाणी वाचवा', 'वनस्पती आणिपशू आपले मित्र आहेत', 'निसर्गाकडे चला' यासरखे अनेक घोषवाक्य आज मोठ्या प्रमाणत निनांदत आहेत. याचे कारण मानवाला भविष्याच्या धोक्याची चाहूल लागलेली आहे. पृथ्वीवरील जीवन, पोषक पर्यावरण नष्ट होणार अशी चिंता मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर या विषयी चिंतन केले जात आहे. हजारो वर्षांपासून मानव नैसर्गिक साधनसंपत्तीचे आपल्या उपजीविकेसाठी संवर्धन करीत होता. तो निसर्गाचा पूजक वनरक्षक होता. वेदकाळापासून जंगलांच्यासंवर्धनाचे अनेक दाखले आहे. जंगलाचे रक्षण करणाऱ्याला 'वनप' तर वृक्षांची सुरक्षाव्यवस्था पाहणाऱ्याला 'दावप' म्हणून संबोधले जायचे. निसर्गाप्रति पूज्यभाव व्यक्त केला जात असे. वेद काळात 'ऋत' ही संकल्पना वैश्विक नैतिक नियम म्हणून नैतिक सदाचरणाचे आचरण करावयास लावणारी, पर्यावरणाशी संबंधित संकल्पना विकसित केलेली होती. निसर्गाच्या नियमबद्धतेला 'ऋत' म्हटले जात होते. ऋत हे अनुलंघनीय मानले जात असत.

आधुनिक काळात आपल्या सभोवताली जीवसृष्टी, मानव, समाज, हवा, पाणी, नद्या, डोंगर, पशूपक्षी, जीवजंतू, वनस्पती, वने इत्यादी सर्व घटकांना पर्यावरण म्हटले जाते. पर्यावरणशास्त्र ही जीवशास्त्राची एक अत्यंत महत्त्वाची शाखा आहे. पेट्राइड्सच्या मते, परिस्थितीतील जे घटक जीव सृष्टीच्या हितावर नियंत्रण ठेवून प्रसाराचे, विपूलतेचे, निर्मितीचे व उत्क्रांतीचे नियमन करतात अशा घटकाचा अभ्यास या शाखेत केला जातो. प्राचीन काळी वेदवाङ्मय, रामायण, महाभारत, अष्टाध्यायी (पाणिनी) बृहत संहिता (वराह मिहिर),चरकसंहिता, सुश्रुत संहिता या आयुर्वेदिक तसेच ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकाराम गाथा, नाथांचे अभंग इत्यादी ग्रंथामधून पर्यावरणासंबंधी मूलभूत चिंतन झालेले आहे.

गीतेमधील भावार्थ स्पष्ट करतांना ज्ञानेश्वरांनी जीवसृष्टीच्या प्रेमामुळे आपल्या सूक्ष्म निरीक्षणाने निसर्गातील विविध घटकांचा साकल्याने विचार केलेला आहे.

त्यांनी ओवी, अभंगासारख्या काव्यरचनेतून निसर्गातील विविध घटकांचे वर्णन करून पर्यावरणासंबंधीचे चिंतनच केलेले आहे. नद्या, डोंगर, पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारांगण आणि एकूणच चराचर सृष्टी विषयीचे त्यांचे असलेले प्रेम निसर्गाप्रती पूज्यभाव आलेला दिसून येतो.

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो॥
भूता परस्परे जडो। मैत्र जीवांचे॥ 18-1794

अखिल विश्वकल्याणाची व प्राणीमात्राच्या हिताची तळमळ ज्ञानेश्वरांनी या ओवीतून व्यक्त केलेली आहे. प्रत्येकाचे कल्याण व्हावे, निसर्गाप्रती पूज्यभाव ठेवून पर्यावरणाचा हळूवारपणाने आस्वाद उपभोग घ्यावा. अहिंसा, सत्य, त्याग, शांती, दया, क्षमा, अनासक्ती, मैत्री शौच सौजन्य इत्यादी नैतिक मूल्यांची जोपासना करून आचरणात आणला तर निसर्गाचे पर्यायाने पर्यावरणाचे संवर्धन होईल. ज्ञानेश्वरांनी नैतिक मूल्यांना "दैवी संपत्तीचे गुण" असे संबोधले. 'जगा आणि जगू द्या' हा प्रकृतीचा संदेश ही त्यांनी आपल्या चिंतनातून अप्रत्यक्षरित्या दिला आहे. प्रदूषण विरहित हवा, पाणी, जमीन असेल तरच मनुष्याचे जीवन निरोगी, दिर्घायुष्यी राहू शकते त्यासाठी पर्यावरण समृद्ध असणे आवश्यक आहे.

निसर्गात ऋतूचे चक्र अव्याहतपणे चालू आहे. ज्ञानेश्वरीत वसंत, ग्रीष्म, शरद, शिशिर, वर्षा या ऋतूंचे उल्लेख प्रसंगपरत्व आलेले आहेत. त्या त्या ऋतूच्या वैशिष्ट्यांची त्यांनी नोंद घेतलेली आहे. वसंतऋतूत वनातील वृक्षलता हिरव्यागार, टवटवीत व फुलाफळांनी बहरलेल्या असतात. म्हणून वसंत ऋतूला त्यांनी 'ऋतूपती' असे संबोधले. या ओवीतून तसा उल्लेख आलेला आहे.

जैसे ऋतूपतिचे द्वार। वनश्री निरंतर ।
वोळणे पळभर।लावण्येसी ॥ 3-100
का वसंताचिया वाहणी । आलीया वनश्रीचिया अक्षौहिणी ।
ते न करीतुचि घेणी।निगाला तो ॥ 16-164

ज्ञानेश्वरीमध्ये वृक्षांची, पशुपक्ष्यांची नावे, प्रसंगपरत्वे धातूची नावे ही दृष्टांत रूपक व उपमा याद्वारे आलेले आहे. आरण्यांना त्यांनी 'निकुंज' म्हटले आहे. त्यांनी आपल्या लेखनात निसर्ग, पर्यावरण या शब्दांचा उल्लेख कुठेही केलेला आढळत नाही. 'जीवसृष्टी' आणि 'भूतसृष्टी म्हणजेच 'पर्यावरण' असा अर्थ दिसून येतो.

यापरी माझां भावी। हे जीवसृष्टी आहे आहावी
गुंतली असे जाणावी।पंडू कुमरा ॥ 10-90

किंबहु ना यापरी।निजप्रकृती अंगीकारी।
आणि भूतसृष्टी एकसरी।प्रसवेंचि लागे ॥ 9-117

ज्ञानेश्वरांची जीवसृष्टी किंवा भूतसृष्टी ही संकल्पना जी ए. पेट्राइड्स यांनी सांगितलेल्या पर्यावरण शास्त्राजवळ जाणारी असल्याचे दिसते.

जो हा भूतग्रामू आघवा । असे प्रकृति आधीन पांडवा ।
जैशी बीजाचिया वेलपालवा । समर्थ भूमी ॥ 9-117
आकाशे सर्वत्र वसावे। वायूने नावभरी उगे नसावे।
पावके दहावें। वर्षा वे जलें ॥ 9-281

निसर्ग सृष्टीतील विविध घटकांचे चक्र हे अव्याहतपणे चालू आहे जे की जीवसृष्टीच्या हितावर नियंत्रण ठेवून त्याच्या प्रसाराचे, निर्मितीचे व उत्क्रांतीचे नियमन करत असल्याचे ज्ञानेश्वरांनी सांगितलेले आहे.

नगरे रचावी। जळाशये निर्मावी।
महावने लावावी।नानाविधें॥ 14-233
वसंत तेथ वने। वन तेथे सुमने।
सुमनी पालिंगने। सारंगाची॥ 18-1635
नातरी उद्यानी माधवी घडें। तेथ वनशोभेची खाणी उघडे।
आदिलापासोनि अपाडे। जियापरी॥ 1-43

ज्ञानेश्वरांनी पर्यावरणनीतीचा बोध आपल्या ओवीतून करून दिलेला आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपभोग मानवाने जरूर घेतला पाहिजे. कृतज्ञतेच्या भावनेतूनच परोपकारार्थ ही नैसर्गिक साधनसंपत्ती मानवाला निसर्गतःच देणगीच्या रूपाने मिळालेली आहे. त्याचा उपयोग आपल्या समृद्धीसाठी मानवाने करून घेताना सत्कर्माची वाटचाल सदैव केली पाहिजे. निसर्गाचे संतुलन बिघडू न देणारी नगरे रचावी, घरे बांधावी, जलाशय निर्माण करावे, वृक्ष लावावेत, महावने, उद्याने निर्माण करावी असे सांगून पर्यावरणाचे महत्त्व मांडलेले आहे.

पर्यावरणीय जाणिवेची बीजे ही भारतीय संस्कृतीतील पंचमहाभूतांना परमेश्वर मानणाऱ्या तत्त्वात ही विशेषत्वाने दिसते. पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश ही पंचमहाभूते विश्वनिर्मितीचे कारण मानले जाते. म्हणूनच सूर्याला सूर्यनारायण, धरित्रीला माता, वाऱ्याला वायुदेव, पाण्याला पर्जन्यदेव तर आकाशाला विश्वब्रम्हांड मानले जाते. हेच परमेश्वराचे व्यक्त रूप आहे. हीच श्रद्धा ठेवून संतांनी पंचमहाभूते व सृष्टीचक्राचा अनुबंध लावलेला दिसून येतो. समर्थ रामदास यांनी 'दासबोध' या ग्रंथात पंचमहाभूतांविषयी म्हटले आहे.

"पंचभूते झाले जग।पंचभूतांची लगबग
पंचभूते गेलिया मग।काय आहे॥"

ह्या जगाची निर्मिती पंच महाभूतांमुळेच आहे असे संत रामदासांनी जानले होते. कृषिसंस्कृती आणिपंचमहाभूतांचे महत्त्व यातूनच निसर्ग संवेदन आकारास आलेले आहे

"नद्या पर्वताहून कोसळल्या। नाना सांकडीमध्ये रिचवल्या।
धबाबां खळाखळा। चालील्या असंभव्य॥"

मानवी जीवनात डोंगर पर्वतांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण त्यांना मेघराजाचे वस्तिस्थान मानण्यात आले आहे. उंच डोंगर व दाट झाडी मेघांना अडवून धरते. तेव्हाच पाऊस पडू लागतो. मानवी जगण्याची समृध्दता व सुफलता ही पर्जन्यवृष्टीवर अवलंबून असल्याने पर्यावरण संतुलनात डोंगर-पर्वताचे महत्त्व सांगतांना म्हणतात -

'जितुके गिरी तितुक्या धारा। कोसळती भयंकरा'

पर्वत हे नदीच्याउगमाचे मूळ स्थान आहे. पर्वतामुळेच संपूर्ण भूतलावर समृद्धी आणणाऱ्या नद्या दुथडी भरून वाहतात.संत एकनाथांनीही पर्वताची परोपकारी वृत्ती विशद केलेली आहे

"त्या पर्वता ऐसी तत्त्वता।ठसावी साधकाची उदारता।
काया वाचा आणि चित्ता।सर्वस्व देता उल्हासू॥
परमार्थाचिया चाडा।स्वार्थ सांडोनी रोकडा।
परोपकारार्थ अवघडा।रिघे साकडा परार्थै॥"

पर्वत हा उदार आहे त्याच्या उदरात असलेल्या वृक्ष, वेली आयुर्वेदिक वनस्पती या आनंद देताता त्यांच्यात कोठे ही स्वार्थ नसून तो इतरांना भरभरून देतो त्याच्यावर पडणारे पाणी, वृक्ष, वेली गवत त्यांच्यात असणारी औषधी तो दुसऱ्यांनाच देत असतो. ही उदारता मानवामध्ये येणे अपेक्षित आहे. एखाद्या साधकाप्रमाणेच तो इतरांसाठीच जगतो म्हणूनच संत एकनाथांना वाटते मानवीजीवनावर निसर्गाचे अनंत उपकार आहेत.

पिंगळा हा पक्षी निसर्गातील घडामोडीची जाणीव करून देतो. पिंगळ्याचे सांकेतिक संकेत घेऊन 'पिंगळा' नावाचा बहुरूपी लोकजीवनात पहाटे येऊन निसर्गातील घडामोडीचे भविष्यवजा सूचन करतो असे एकनाथ महाराज यांनी पिंगळ्यावरील रूपकात सांगितलेले आहे.

"पिंगळा महाद्वारी।बोली बोलतो देखा॥
शकुन सांगतो तुम्हा।हा एक ऐका॥"

पिंगळ्यावरील रूपकातून नाथांनी मानवी मनाचे समर्पक असे चित्रण केलेले आहे असे दिसते.

संत कबीरांनीही पृथ्वीचे पर्यावरणाचे महत्त्व आपल्या रचनेतून मांडले आहे त्यांनी प्रकृतीला शाश्वत रूप मानले असून तिची उदारता अधोरेखित केली. (धरती), पृथ्वी, आकाश, वृक्ष यांना निरपेक्ष मानले आहे जे दुसऱ्यासाठी कायमच योगदान देत असतात.

"सबकी उतपति धरती, सब जीवन प्रतिपाल।
धरति न जाने आप गुन ऐसा गरू विचार॥"

पृथ्वी अन्न, जल, फळ, फुले, औषधी इत्यादी सर्व मानवाला देते. कधीही अहंकार (घमंड) करत नाही की, मोबदलाही घेत नाही. तिच्या या दातृत्व वृत्तीला त्यांनी गुरू मानावे जी कोणताही पक्षपात करत नाही.

"वृक्ष कबहूँ नहिं फल भखै नदी न संचै नीर ।
परमारथ के कारने, साधून धरा सरीर ॥"

संतांनी स्वत:च्या वर्तनातून पर्यावरणाचा समतोल सांभाळला आहे. त्याचप्रमाणे मानवानेही हा समतोल टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावा ही अपेक्षा व्यक्त करतात.

"वृक्षावल्ली आम्हा सोयरे वनचरे ।
पक्षी ही सुस्वरे आळविती।
तेणे सुखे रूचे एकांतचा वास ।
नाही गुण दोष अंगा येत ॥'

असे म्हणणाऱ्या संत तुकारामांनी वृक्ष, वेलींना आपले सगे, सोयरे मानले आहे. सगे-सोयऱ्यांना ज्या प्रमाणे कोणताही त्रास देत नाही त्यांची सेवा करतो हे लक्षात घेऊन मानवाने ही वृक्ष, वेलींना त्रास न देता त्यांचे संगोपन केले पाहिजे. 'दुर्दर राहे पाषाणार्त तसर वरीर कोण देत ।" असे म्हणत संतांनी प्रश्न केलेला आहे की, जर एखाद्या खडकाखाली राहणाऱ्या बेडकाला आपण चारा देत नाही तर त्याच्या चक्रात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आपणास कदापि नाही.

रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडांचे संगोपन न करता त्याच्या बुडाची साल तोडून, काढून तिचा उपयोग लोक स्वत:साठी करतात. त्यामुळे वृक्ष वाळतो, झाडाला कोचे पाडून त्यातून रस, चिक काढून झाडाला त्रास दिला जातो. त्याविषयी संत ज्ञानेश्वर म्हणतात - 'आजातशत्रू तरुवरा सर्वांत्री देव विलिया शिरा ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा कोरडे केले।' स्वार्थापोटी आजातशत्रू असणाऱ्या वृक्षाला कोरडे करणे म्हणजे आपण आपले जीवन कोरडे करून घेणेच होय असा संदेश त्यांनी यातून दिला. व्यक्तिच्या स्वभावाचा गुण दोष सांगातांना सज्जन माणसे कशी सरळ, साधी असतात सज्जनांना दगड ही कसा देव वाटतो तर दुर्जनांना देव ही दगड वाटतो हे सांगतांना संत तुकाराम म्हणतात

"निंबाचिया झाडा साखरेचे आळे। बीज तैसी फळे येती तया॥

तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ। कठीण हा खळ तया हूनी॥' ओ. 261

कडूनिंबाच्या वृक्षास साखरेचे आळे केले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही कारण त्याचे बीजच कडू आहे. त्यामुळे त्याची फळे ही कडूच असणार याची खात्री ही आहे. तसेच दुष्टपुरुषांबद्दल ही त्यांनी सांगितले त्यांचे हृदय हे वज्रापेक्षाही कठीण आहे. इतरांना फसवितांना त्यांना काहीच वाटत नाही. खल लोकांविषयी अनेक प्रतिमा वापरून त्यांचा कठोरपणे दंभस्फोट केलेला आहे.

संतांच्या साहित्यात आलेले पक्षांचे संदर्भ ही एका अनोख्या निसर्गसंवेदना आविष्कारआहे. कोकिळ, पिंगळा, चातक, कावळा, पावशा, मोर या पक्षांचे उल्लेख अनेक ठिकाणी आलेले आहेत. संत एकनाथांनी पोपट, पाखरू, वटवाघूळ, टिटवी इ. पक्षी तर विंचू, गाय, एडका, कुत्रे ही पशूविषयक रूपकेही वापरलेली आहेत. पक्षी हे पर्यावरणाचे दूत आहेत. "पैल तोगे काऊ कोकता हे' असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांसाठी कावळा हा पाहूणे येणार हे सांगतो. शकून सांगणारा पक्षी म्हणून तो परिचित आहे.

समाज हा सभोवतालच्या निसर्गाने व्यापलेला आहे. समाजाचा सर्वांगिण विकास पर्यावरणावर अवलंबून असतो आणि या समाजातूनच मानव निर्मित पर्यावरण आकाराला येते मानवी जीवन हे बऱ्याच अंशी निसर्गावरच अवलंबून असते. मानवाच्या विकासावर नैसर्गिक पर्यावरणाचा केवळ परिणामच होतो असे नाही तर मानवी विकासात निसर्गाचा मोठा वाटा असतो. मानवाच्या इच्छा स्फूर्ती या निसर्गावर अवलंबून असून मानव ही निसर्गाचाच आविभाज्य भाग असून इतर प्राणी मात्राप्रमाणे त्याच्या सर्व हालचालीवर जवळपास प्रत्येक संतांनी आपल्या रचनेतून मानव हा निसर्गाशी निगडीत असून मानवी प्रगती किंवा अधोगती, सुख-दु:ख इत्यादींचा संबंध निसर्गाशी असतोच हे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकंदरच मानवी विकास किंवा अधोगती निसर्गाशी, पर्यावरणाशी संबंधित आहे. त्यामुळेच कदाचित संतांनी भक्तीबरोबरच पर्यावरणावर ही लक्ष केंद्रित करून निसर्गाचा सन्मानच केलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ :**

1. ज्ञानेश्वरी - संपा. - शं. वा. दांडेकर
2. सकल संत गाथा 1 व 2 - संपा. - श्री. का. अ. जोशी
3. श्री सार्थ दास - संपा. - ह. भ. प. ल. रा. पांगारकर
4. श्री सार्थ ज्ञानेश्वरी - ह. भ. व. प. मामासाहेब दांडेकर
5. परामर्श - पर्यावरणविषयक तत्त्वज्ञान विशेषांक - मराठी त्रैमासिक प्रकाशन, पुणे विद्यापीठ, खंड 17 अंक
6. सार्थ श्री तुकाराम गाथा - संपा. - बेणारे, डॉ. गोपाळराव गोविंद सरस्वती ग्रंथ भांडार पुणे 1999
7. बीजक - सद्‌गुरू कबीर साहब कृत विवेक प्रकाशिनी श्री कबीर ज्ञान प्रकाशन केंद्र, झारखंड (दो. सं. 201 पृ478)
8. सामाजिक व सांस्कृतिक भूगोल - डॉ. घारपूरे विठ्ठल पिंपळा ॲण्ड कं पब्लिशर्स, पुणे
(संदर्भास घेतलेले अभंग, ओवी या वरील ग्रंथातून घेतलेले आहे.)

**संत साहित्यातील पर्यावरण**

**डॉ. अर्चना काटकर**